# भुयारी मेट्रोतून प्रवास पुढच्या वर्षी

## डिसेंबर २०२३ ची डेडलाइन हुकली, मुख्यमंत्र्यांनी केली प्रकल्पाची पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईतील पहिलीवहिली भुयारी मेट्रो म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मेट्रो ३ मार्गिकेवरून मुंबईकरांना आता पुढच्या वर्षीच प्रवास करण्याची संधी मिळणार आहे. मेट्रो ३ चा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ मध्ये सुरू करण्यात येणार होता; मात्र, दिरंगाईने सुरू असलेल्या कामामुळे मेट्रो ३ च्या कामाची डेडलाइन हुकली आहे. या मेट्रो प्रकल्पाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच पाहणी केली.

दक्षिण मुंबईतील कुलाबा ते पश्चिम उपनगरातील अंधेरी सीप्झदरम्यान मेट्रो ३ चालवली जाणार आहे. या मेट्रोचे कारशेड आरे कॉलनी येथे असून, या ३३ किमी लांबीच्या प्रकल्पासाठी ३३ हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. मेट्रो ३ प्रशासनाकडून या प्रकल्पाचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी हा डिसेंबर २०२३ पर्यंत सुरू करण्यात येणार होता; मात्र, कारशेडचे काम अपूर्ण असल्याने तसेच कारशेडमध्ये दाखल झालेल्या सर्व गाड्यांची चाचणी न झाल्याने मेट्रो ३ ची डेडलाइन हुकली आहे.



मेट्रो ३ च्या प्रकल्पाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी पाहणी केली.

**मार्गिकेवर २७ स्थानके**

या मार्गिकेवर २७ स्थानके आहेत. मेट्रो ३ मार्गावरील आचार्य अत्रे चौक या स्थानकाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री दीपक केसरकर यांनी भेट दिली. प्रदूषण टाळण्यासाठी योग्य ती खबरदारी घेण्याचे व प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्याचे मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.